


बक्षीजींच्या आठवणी...

२१ जुलै रोजी संपन्न झालेल्या आनंद बक्षींच्या ७५व्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना उजाळा...

□ विजय अकेला

१९९१-९२च्या सुमारास आम्ही आमच्या कारकीर्दीची सुरुवात केली. त्यावेळी मजरूहसाहेब, इंदिवरसाहेब आणि बक्षीसाहेब हे तीन नामवंत गीतकार सक्रीय होते. आम्ही या तिघांबरोबर काम केलंय. त्यातही बक्षीजींविषयी विशेष आपलेपणा वाटायचा. निर्माता आणि कथेच्या मागणीनुसार अर्थपूर्ण गीतं देणारे गीतकार म्हणून बक्षीसाहेबांचं नाव आवर्जून घेतलं जात असे. या वैशिष्ट्यामुळेच बक्षीसाहेबांनी सुमारे पाच दशकं या इंडस्ट्रीत राज्य केलं.

रिटर्न ऑफ ज्वेलथीफ हा त्यांच्याबरोबर केलेला आमचा पहिला चित्रपट. त्यावेळी आम्ही जरा जास्तच जोशात होतो, पण बक्षीसाहेब वास्तवाचं भान ठेवून होते. त्यांनी तर दिग्दर्शकालाही 'हा सिनेमा हवा तसा बनत नाहीये' म्हणून स्पष्टपणे सांगितलं.

ते म्हणायचे, 'खरी गंमत गीतात नाही तर घटनेत असते. प्रसंगाला साजेसं गीत असेल तरच ते प्रभावी बनतं.' हा मुद्दा स्पष्ट करताना ते '*खिलौना* सिनेमाचा उल्लेख करत. 'खिलौना जानकर तुम तो मेरा दिल तोड जाते हो...' हे गाणं का सुंदर बनलं? कारण यातला नायक(संजीवकुमार) एक वेडा, विरहात व्याकूळ प्रियकरच नव्हता, तर तो एक शायरही होता.'


जतिन-ललित

आम्ही त्यांच्याबरोबर फारच थोडे चित्रपट केले. पण त्या कमी कालावधीतही बरंच काही शिकायला मिळालं. ते संगीतातली चाल, सूर, ताल या सगळ्या गोष्टींचा खूप खोलात जाऊन विचार करत. त्यामुळेच त्यांच्या शब्दांना संगीत देताना आम्हालाही सोपं जायचं. ते स्वतः फार चांगले गायक होते. त्यामुळे चांगल्या ट्यून्स मिळतील असेच बोल लिहीत. *दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे*च्या वेळी अशीच गंमत झाली. त्यांना आमच्या चाली आवडल्या. त्यावर चपखल बसतील असे नेमके शब्द त्यांनी लिहीले आणि त्या सिनेमाची गाणी सुपरहिट झाली. *मोहब्बतें*च्या संगीताच्या बाबतीतही असंच झालं. ज्या ज्या निर्मात्यांसाठी त्यांनी गीतलेखन केलं, त्या निर्मात्यांनी आपल्या पुढच्या सिनेमासाठी बक्षीजींच्याच नावाचा आग्रह धरला. याचं कारण बक्षीजींना एकच पर्याय होता, स्वतः बक्षीजी!


संगीतकारांना त्यांच्या घरी जावं लागायचं. पण त्यांच्या घरून कधीच कोणी संगीतकार रिक्त हस्ते किंवा असमाधानी भावनेने परतला नाही. जास्तीत जास्त दोन तासात ते संगीतकाराच्या ट्यूनसवर, सिच्युएशनला साजेसं गीत लिहून देत. चित्रपटगीत असो नाहीतर नॉन फिल्मी, ते हृदयस्पर्शी रचना करत. त्यांच्याबरोबर काम करायची संधी मिळाली हे खरोखरच आमचं सुदैव म्हणावं लागेल. आठवड्यातून एकदा तरी त्यांचा फोन यायचाच. मग ते आम्हाला प्रेमळ शब्दात दम द्यायचे. म्हणायचे, 'अरे तुम्ही कुठे आहात? फोन का नाही करत?'

*दिल क्या करे*च्या वेळची आठवण कधीच विसरणार नाही. बक्षीजींची गीतं सुरेख झाली होती, पण ती नाकारणाऱ्या माणसांची या क्षेत्रात काहीही हैसियत नव्हती. आम्हाला ही गोष्ट खूप खटकली. बक्षीजींनी एकदा राजसाहेबांनाही(*बॉबी*साठी) सिच्युएशन बरोबर नाही म्हणून स्पष्टपणे सांगितलं. पण राजसाहेब आपला मुद्दा सोडायला तयार नव्हते. त्यांनी बक्षीजींना सांगितलं, 'तुम्ही तुमचं काम करा.' झालं. गीत तयार झालं, शूटही झालं, पण मागाहून राजसाहेबांनी ते सिनेमातून काढून टाकलं. बक्षीजी गाण्यात एक 'हुक' असा ठेवायचे, जो वारंवार गुणगुणायचा मोह होत असे.

आम्हाला ते कधीच उदास दिसले नाहीत. कधी कोणत्या दुसऱ्या शायरचं गीतकाराचं पुस्तक वाचताना दिसले नाहीत. त्यांची स्वतःच्या गाण्यांची एक वही सतत बरोबर असायची.

त्यांच्याकडे फक्त चांगुलपणाच होता. दुर्गुण औषधापुरताही नव्हता. स्वभावात हट्टीपणा, हेकेखोरपणा तर अजिबात नव्हता. बस, समोरच्याला हवं तसं गीत लिहून मोकळे होत. त्यांना मद्याची आणि पानाची सवय नसती तर फार चांगलं झालं असतं. आपल्या तोडीचा एकही गीतकार इंडस्ट्रीत नाही हे माहीत असूनही त्यांनी कधीच कोणाची अडवणूक केली नाही हे विशेष. आम्ही दोघं तर त्यांच्याबरोबर घालवलेले ते क्षण कधीच विसरू शकणार नाही. ✶

राजेश खन्नावर चित्रित बक्षीजींच्या निवडक गीतांची यादी पहा पान नं. ४० वर



बक्षीजींच्या जीवनाचं सूत्र होतं: 'रोना कभी नहीं रोना...'